



जातो तिथे नदी असेल तर तिथे विसावल्याशिवाय, तिचं दर्शन घेतल्याशिवाय, माझा प्रवास पूर्ण होत नाही. प्रत्येक नदीत मी सरस्वतीला शोधतो. तीच कॅनव्हासवर उतरते. एक नदी लोप पावते, तेव्हा तिथे बऱ्याच गोष्टी घडतात. तिथली संपूर्ण वस्ती, सारं काही नष्ट होतं. याचा अभ्यास केला तेव्हा असं जाणवलं की, काही झालं तरी, माणूस स्वत:चं अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करतो. गेल्या शंभर वर्षांमध्ये अनेक नद्या पृथ्वीतलावरून नाहीशा झाल्या आहेत. अगदी प्रत्येक खंडाचा इतिहास पाहिला तर हेच दिसून येतं. पण एका नदीचं अस्तित्व नामशेष होतं, तेव्हा तिथला संपूर्ण परिसर त्याचे दुष्परिणाम भोगत असतो. निसर्गामध्ये होणारा बदल, त्यामुळे जे चित्र एकूणच आजूबाजूच्या परिसराला, जी काही विनाशकालीन अवस्था पाहावी लागते ती माझ्या चित्रात पाहायला मिळते.'' ते पुढे सांगतात, ''अर्थात हा माझा विषय नाही. पण या सगळ्याचं आकलन होतं गेलं. मनावर एक दडपण असतं. याला कारणीभूत कुठेतरी मनुष्यच असतो. याच्यावर काहीतरी करायला हवं. माझ्या अंतर्मनात हे साचलेलं आहे. ते चित्रातून मांडलं.''

जोशी सरांची आपली कला बहरली खरी; पण ती किती लोकांपर्यंत पोहोचत असेल, असं एक प्रश्नचिन्हही त्यांच्या मनात असतं. ते म्हणतात, ''एक पॉझिटिव्हिटीही आहे की, अमूर्त चित्रकलेविषयी फारशी माहिती नसली तरी, ते परिणामकारक असतं. अगदी त्यातलं तंत्र कळलं नाही, त्याच्याकडे कसं बघावं, कसं अनुभवावं, हे जरी कमी प्रमाणात माहीत असलं तरी, या चित्रांचा प्रभाव इतका जबरदस्त असतो की, कुठेतरी कलाकाराला काय सांगायचं आहे हे वेगवेगळ्या पद्धतीने समजून घेणारा रसिकवर्ग आहे याचं समाधान मिळतं. याचा एक अनुभव सांगतो, बेंगलोरमध्ये लीला पॅलेस हॉटेलमध्ये प्रदर्शन भरलं होतं. एक पेंटिंग असं होतं की, बरेच लोक येऊन ते बघत होते. एक लहान मुलगा आणि त्याची आई हे चित्र निरखून पाहात होते. थोडा वेळ थांबून तो मुलगा त्या आईला म्हणतो, 'लुक मदर, नेचर इज अँग्री.' म्हणजे मला जे काय सांगायचं होतं ते त्या लहानग्याला कळू शकतं, त्या मुलाची ही प्रतिक्रिया माझ्यासाठी एक पारितोषिकच होतं.'' ते म्हणतात, ''अमूर्त चित्रकला ही पाहणाऱ्याच्या मनातील कारणांच्या पलीकडची आहे. तुम्हाला तुमच्या अंतर्मनात उतरून ती शोधायची आहे. ही एक युनिव्हर्सल भाषा आहे. माझं चित्र मी कुठे ठेवलं आहे, ते तुम्ही जिथे ठेवाल तिथं त्या त्या भाषेत तुम्हाला दिसते. कारण प्रत्येक देशाची संस्कृती, तो समाज, त्याचे विचार, अनुभव हे वेगळे असतात. तरीही ते चित्र काय आहे, कलाकाराला काय सांगायचं आहे, त्याच्या भावना काय आहेत हे कळतं. जे दिसतं तसं काढलं की, त्याला अधिक पसंती मिळते. गेल्या पंधरा वर्षांत आपल्याकडील रसिकवर्ग अमूर्त कलेकडे आकर्षित झाला असल्याचं दिसतं.''

देश-विदेशात जोशी सरांच्या चित्रांची प्रदर्शने भरली आहेत. ते म्हणतात, ''अनेक ठिकाणचे अनुभव वेगवेगळे. यातून बरंच काही शिकता येतं. तुर्की येथील इजमेर आर्ट गॅलरीत भरलेलं प्रदर्शन. इथे एक गोष्ट लक्षात आली, की इथे कला कोणाची यापेक्षा ती काय आहे हे समजून घेणारा रसिक वर्ग पाहायला मिळतो. इथे मीपणा संपलेलाच असतो. तोच खरा कलाकाराला जिवंत ठेवतो. अहंपणाशिवाय असलेलीच कला कशी मानसन्मानास पात्र ठरते हे तिथे शिकता आलं.''असे अनुभवच कलाकाराला त्याच्या पुढच्या प्रवासासाठी प्रेरणा देत राहतात.